# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- ६३६/२०२३

**अपिलार्थी, श्री.सुदेश रोहरा**
३०१, गायत्री अपार्टमेंट, देवनी भवानी मंदिर
नेहरु चौक, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००२

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,
प्रभाग समिती क्र.३, उल्हासनगर महानगरपालिका,
स्व.बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल, उल्हासनगर,
जि.ठाणे ४२१ ००४.

जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अति.आयुक्त (शहर),
उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**व्दितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : दिनांक .१६.०६.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १६.११.२०२२ | -- | १२.०१.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. ०६.०३.२०२३ रोजीच्या अर्जान्वये *"PIO PWD has not responded within time limits mentioned under RTI act २००५. FAA failed to conduct hearing & has not passed any order till today. treating "* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर व्दितीय अपिलावर आज दिनांक १६.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी ऑनलाईन उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.संदिप जाधव, कार्यकारी अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" Information required under RTI act 2005 for Trimming, Cutting, Removing of Tress from VTC ground Ulhasnagar-4.*

1) *Provide the names & total number of trees (i) trimmed (ii) Razed (iii) cut upto bottom (iv) removed from the land.*
2) *Provide the certified copy of permission received from High Court for cutting/ trimming or removing of trees as PIL (155/2016) is pending in High Court.*
3) *Please Provide the certified copy of permission/order/letter received from Civic Body (Tree Authority) for cutting/trimming or removing of trees.*
4) *Please provide the name & address of vendor/contractor who purchased the wood removed from the trees. Provide the copy of contract agreement.*
5) *Please provide the amount credited to UMC department for trees desposed.*
6) *Please provide the address where woood removed from trees are deposited.*
7) *Please provide the total No. of trees planted against each & every tree removed."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांनी दाखल केलेल्या मुळ अर्जाच्या अनुषंगाने त्यांना विहित मुदतीत माहिती प्रापत झालेली नाही. तसेच त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आली नाही व कोणताही आदेश पारित केलेला नाही. व्दितीय अपील दाखल केल्यानंतर त्यांना दि.२२.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती

देण्यात आलेली आहे. तथापि ही माहिती सुध्दा केंवळ मुद्या क्र.०७ शी संबंधित आहे. त्यांनी मागीतलेली मुद्या क्र.०१ ते ०६ ची त्यांना देण्यात आलेली नाही.

सुनावणीस उपस्थित प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.संदिप जाधव, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी ही वस्तुस्थिती मान्य केली. तसेच उपरोक्त माहिती अपिलार्थी यांना देण्यात येईल. असेही त्यांनी निवेदन केले.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महागनरपालिका यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्या क्र.७ ची माहिती वगळून, उर्वरित मुद्या क्र.०१ ते ०६ ची माहिती त्यांना विनामुल्य पुरविणे योग्य होईल.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत माहिती पुरविलेली नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा, उप अभियंता (सेवानिवृत्त), सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेल्या माहितीपैकी मुद्या क्र.०७ ची माहिती वगळून, उर्वरित मुद्या क्र.०१ ते ०६ ची संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा, उप अभियंता (सेवानिवृत्त), सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १६.११.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ जून, २०२५.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अश्विनी अहुजा, उप अभियंता (सेवानिवृत्त), सार्वजनिक बांधकाम विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे.

**-यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुयश बांगर,
कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**यांचे मार्फत प्रत रवाना.**